# भारतातील वाढती महागाई : एक चिकित्सा

**एम बी. अनंतकवळस**

अर्थशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले महाविदयालय,सातारा.

**प्रस्तावना :—**

भारतात सुध्दा दिसून येणारी महागाईची स्थिती ही जागतीक स्तरावरील आर्थिक घटकांचा तसेच देशांतर्गत घटकांचा परिणाम दिसून येतो. जगातील २/३ पेक्षा अधिक देश महागाईच्या समस्येला तोंड देत आहेत. भारतातही महागाईची चर्चा सर्वत्र सर्व स्तरातून होताना आढळते आहे. याचे कारण स्वतंत्र्य प्राप्तीपासूनच सर्वांगिण आर्थिक विकासाचे उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून भारतीय अर्थव्यवस्थेने विकासाचे जोरदार प्रयत्न केले. सुरुवातीच्या कालखंडात अर्थव्यवस्था अतिशय मागासलेली असल्यामुळे कर व करेतर मार्गापोटी सरकारला मिळणारे महसुली उत्पन्न विकास कामासाठी व महसुली खर्चासाठी अपुरे पडत होते व म्हणूनच सरकारला हा खर्च भरुन काढण्यासाठी दरवर्षी पैशाच्या पुरवठयात वाढ करावी लागली. अर्थव्यवस्थेत पायाभूत संरचना निर्माण करण्यासाठी मोठयाप्रमाणवर पैशाची गरज भासली. त्यातून पैशाच्या पुरवठयात वाढ झाली परंतू अन्नधान्य,खादयतेल, इंधन, स्टील, भाजीपाला या सारख्या महत्वाच्या वस्तूची मागणी ज्या प्रमाणात वाढली त्या प्रमाणात त्याचा पुरवठा होऊ न शकल्याने महागाईत वाढ झाली.

**शोधनिबंधाची निवड :—**

भारत हा विकसनशिल देश असून स्वातंत्र्यानंतरच्या ६४ वर्षात पंचवार्षिक योजनेव्दारे विकासाची दिशा ठरवत असताना देशात नेमकी महागाई कशामुळे होत आहे हे जरी स्पष्ट होत नसले तरी महागाईची समस्या तिव्र व गंभीर आहे. महागाईचा संबंध प्रत्यक्ष मानवी जीवनाशी संबंधित आहे. अशा महागाईच्या कारणांचा शोध अर्थव्यवस्थेच्या विविध घटकाबरोबरच सर्वसामान्य लोकांवर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधात करण्यात आलेला आहे. त्यासाठी अलिकडील बदलांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टये :—**

१) महागाईची संकल्पना समजून घेणे.

२) भारतातील महागाईची सदयस्थिती जाणून घेणे.

३) भारतातील महागाईस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा आढावा घेणे.

४) महागाईच्या परिणामांचा आढावा घेणे.

**गृहीतक :—** १) भारतातील महागाईचा दर सातत्याने वाढत आहे.

२) वाढत्या महागाईचा सामान्य व्यक्तिच्या राहणीमानावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

**संशोधनपध्दती :—**

प्रस्तुत शोधनिबंध हा प्रामुख्याने व्दितीय साधनसामग्रीवर आधारित असून त्यासाठी विविध दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे. त्यामध्ये विविध प्रकारच्या नामांकित, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय दर्जाच्या संशोधन पत्रिका, वेबसाईट, मासिके, शासकीय अध्यादेश, अहवाल, पुस्तके, वर्तमानपत्रातील लेख यांचा वापर करण्यात आलेला आहे.

**महागाई संकल्पना :—**

ज्यावेळी सर्वसाधारण किंमतीची पातळी वाढत जाते. त्यावेळी स्थूलमानाने चलन वाढ होत आहे असे समजले जाते. चलनवाढ म्हणजे वाढत्या किमंतीची प्रक्रिया असते. चलनवाढीत अल्प वस्तूंच्या प्राप्तीसाठी अधिक पैशाचा वापर केला जातो. त्यातूनच महागाई अस्तित्वात येते. महागाईने गरीब, श्रीमंत, उत्पादक आणि उपभोक्ते कोणालाच सोडलेले नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेत अस्थिरता आहे. आणि किमंती या रूपयामध्ये मोजल्या जातात.

१) जेव्हा रूपया अथवा अन्य कोणत्याही चलनामध्ये खरेदी करताना रूपयास अथवा त्या चलनास मिळणाऱ्या वस्तू पुर्वीपेक्षा कमी मिळू लागतात त्यास महागाई असे म्हणतात.

२) पैशाचे मुल्य कमी होणे म्हणजे भाववाढीची स्थिती होय यास महागाई म्हटले जाते.

पैशाची उपलब्धता (वाढ) आणि वस्तूंची उपलब्धता यामध्ये असमतोल निर्माण होतो तेव्हा महागाईचा प्रश्न उभा राहतो. देशात घडून येणारी भाववाढ मोजण्यासाठी घाऊक किमंत निर्देशांक व उपभोक्ता किमंत निर्देशांक याचा वापर केला जातो.

**भारतातील महागाईची स्थिती :–**

सन १९९० नंतर नविन आर्थिक धोरणाचा स्वीकार करण्यात आला. संरचनात्मक सुधारणा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबरोबर आर्थिक सामाजिक व राजकीय क्षेत्रात बदल घडून आले. त्याचा परिणाम चंगळवादी व भोगवादी जीवनशैलीचे अनुकरण करण्यात झाला. परिणामत: विविध प्रकारच्या वस्तू व सेवांच्या मागणीत वाढ होत गेली. किमंत पातळी वाढत असतानाही उपभोग्य वस्तूंच्या खरेदीची मानसिकता कायम टिकून राहीली. उदयोग व सेवा क्षेत्रातील वाढीबरोबर रोजगार, उत्पन्न व क्रयशक्तीत वाढ होत गेली. परिणामत: किमंत पातळी वाढून महागाई वाढली. पुढील कोष्टकावरून वाढणारी महागाईची स्थिती लक्षात येते.

कोष्टक क्रं.१

महागाईची स्थिती (२००२ ते २०१२)

| वर्ष | महागाईचा सरासरी वार्षिक दर (प्राथमिक वस्तू) टक्के | महागाईचा सरासरी वार्षिक दर (सर्व वस्तू) टक्के |
|---|---|---|
| २००२–०३ | ३.४ | ३.३ |
| २००६–०७ | ५.३ | ६.९ |
| २००७–०८ | ४.७ | ७.७ |
| २००९–१० | १०.२ | १२.११ |
| २०१०–११ | ९.६८ | ८.८७ |
| २०११–१२ | ६.८९ | ८.६६ |

संदर्भ : Economic Survey, 2011-2012

देशात २००२ मध्ये महागाईचा सर्व वस्तूंचा दर ३.३% होता तो २००९–१० मध्ये १२.११% एवढा झाला म्हणजे या काळात वाढीचा दर अधिक असल्याचे दिसून येते. सुरूवातीच्या काळात वाढीचा दर कमी होता त्यामुळे फारशी जाणीव झाली नाही ती वाढ विकासाला अनुकूल अशीच राहिली परंतु त्यानंतर अधिक झाल्याने अनेक दुष्परिणाम जाणवत आहेत.

**भारतातील महागाईची कारण मिमांसा** :–

भारतीय महागाईच्या कारणांचा शोध घेता असे लक्षात येते की सुरूवातीपासूनच आपले आर्थिक नियोजन चुकीच्या पायावर आधरलेले आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेत खर्चात सातत्याने वाढ झाली मात्र उत्पादनाची उद्दिष्टे गाठताच आली नाहीत. परिणामी अर्थव्यवस्थेत तूट वाढण्यास सुरूवात झाली आणि ती सध्याही वाढतच आहे. याशिवाय पुढील अनेक घटक जबाबदार आहेत.

१) **पैशाच्या पुरवठयातील वाढ :–**

देशात विकासाच्या प्रक्रियेत व पायाभूत सुविधा वाढविण्यास पेशाची गरज वाढत गेली त्यातून पैशाचा पुरवठा वाढवावा लागला. खाजगी बॅकाकडून वेळोवेळी मोठया प्रमाणात कर्ज घेतली व यातूनच पतपैशाचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढले. भारतीय अर्थव्यवस्थेत पैशाच्या पुरवठयात झालेली वाढ.

कोष्टक क्रं.२

| वर्ष | पैशाचा एकूण पुरवठा | पैशाच्या पुरवठयातील निव्वळ वाढ |
|---|---|---|
| १९७०–७१ | १२,२०२ कोटी रू. | – |
| १९८०–८१ | ६२,४०६ कोटी रू. | ५०,२०४ कोटी रू. |
| १९९०–९१ | २,८०,५०९ कोटी रू. | २,१८,१०३ कोटी रू. |
| २०००–०१ | १३,३७,५५५ कोटी रू. | १०,५७,०४६ कोटी रू. |
| २००५–०६ | २३,५८,६३६ कोटी रू. | १०,२१,०८१ कोटी रू. |
| २००९–१० | ५६,२८,६७० कोटी रू. | ३२,७०,०३४ कोटी रू. |
| २०११–१२ | ७३,७०,०४०कोटी रू. | १७,४१,३७०कोटी रू. |

संदर्भ – आर.बी. आय. बुलेटिन १२ जानेवारी २०१२

वरील आकडेवारीवरून १९८०–८१ ते २०११–१२ या कालखंडात पैशाच्या पुरवठयात ७३,०७,६३४ कोटी रू. वाढ झाली याचा अर्थ असा की या वर्षाच्या कालखंडात पैशाच्या पुरवठयात ११८ पटीने वाढ झाली. यातून लोकांची क्रयशक्ती वाढून मागणी वाढते व महागाई वाढीस मदत होते.

२) **अन्नधान्य उत्पादनातील घट :–**

देशात निर्माण झालेल्या महागाईचे मुख्य कारण म्हणजे देशांतर्गत अन्नधान्य उत्पादनातील होणारी घट होय. याचे मुख्य कारण म्हणजे जागतिक तापमानातील बदलामुळे मान्सुनचे कमी होणारे प्रमाण तर काही ठिकाणी अतिवृष्टी त्याचा परिणाम शेती उत्पादनात घट होण्यात होत आहे. ही स्थिती पुढील कोष्टकावरून लक्षात येते.

कोष्टक क्रं.३

भारतातील प्रमुख अन्नधान्य उत्पादन स्थिती टक्के

| अ.नं. | बाब | १९९४–२००४ | २००४–२००५ | २००५–२००६ | २००६–२००७ | २००७–२००८ | २००८–२००९ | २००९–२०१० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अन्नधान्य | ०.६९ | –६.९६ | ५.१६ | ४.१६ | ३.२१ | १.३४ | –८.०० |
| २ | तेलबिया | –०.४३ | –३.३३ | १४.९१ | –१३.१९ | २२.५२ | –५.३८ | –५.०० |
| ३ | ऊस | –०.१५ | १.३८ | १८.६० | २६.४४ | –२.०६ | –२२.१० | –११.८० |
| ४ | फळे | २.४८ | ७.९३ | ४.२६ | ६.४३ | ६.६९ | – | २.५० |
| ५ | भाजीपाला | ३.०३ | ८.०२ | २१.६२ | ४.९६ | ५.३७ | – | ४.८० |
| एकूण अन्नधान्य | | ०.२० | ०.५५ | ५.८७ | ४.१० | ५.३९ | १.६० | –०.२० |

संदर्भ :– इ.पी.डब्ल्यू फेब्रुवारी २७ मार्च ५,२०१०

टेबलवरून देशातील एकूण अन्नधान्य उत्पादनातील सरासरी वार्षिक वृध्दी दर २००४–०५ मध्ये ०.५५ तर २००९–१० मध्ये २०% घट दिसून येते. अन्नधान्य वस्तूंच्या मागणीच्या प्रमाणात अन्नधान्याचा पुरवठा होऊ न शकल्यामुळे अन्नधान्य वस्तूंच्या किंमतीत वाढ झाल्याचे दिसून येते.

३) **इंधनाच्या दरात झालेली वाढ** :–

इंधनाच्या आंतराष्ट्रीय बाजारपेठेतील सतत वाढणाऱ्या किंमती त्याच बरोबर देशातील वित्तीय तूट कमी करण्यासाठी पेट्रोल व डिझेल वरील कस्टमडयुटी २.५% वरून ७.५% वाढल्यामुळे आणि एक्साईज वाढविल्यामुळे पेट्रोल व डिझेलच्या किंमतीत वाढ होऊन महागाईस चालना मिळते.

४) **वाढती वित्तीय तूट :–**

आर्थिक वर्ष २०११–१२ मध्ये ४.१२ लाख कोटी रू. वित्तीय तूट येईल असा अंदाज असताना पहिल्या तिमाहीतच ५५%तूट झाल्याचे दिसून आले. २००९–१० मध्येही ६.८% वित्तीय तूट निर्माण झालेली होती फेब्रुवारी २०१३ पर्यंत ५.३% वित्तीय तूट कमी करण्याचा प्रयत्न होता. परंतू त्यात सरकारला यश आले नाही. याचे कारण सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर काढण्यासाठी २ लाख कोटी रू. उपलब्ध करून दिल्याने, उदयोगांना दिल्या जाणाऱ्या विविध सवलती, शेतकऱ्यांची ७२ हजार कोटी रू.ची कर्जमाफी, या वर्षातील दुष्काळी परिस्थीती, रिझव्ह बॅंकेने स्विकारलेले स्वस्त पैसा धोरण यामुळे पैशाच्या पुरवठयात वाढ होऊन महागाईस अनुकूल वातावरण निर्माण झाले.

५) **शेतीतील कमी गुंतवणूक व शेतमाल विक्रीतील दोष :–**

आयएसीसी चे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक पहवा यांच्या मते भारताच्या शेतीक्षेत्रात गुंतवणूक कमी असल्यामुळे शेतमाल साठवणूकीच्या अपूऱ्या साधनांमुळे जवजवळ ४०% शेतमाल वाया जातो. याशिवाय शेतमाल विक्रीत मध्यस्थांचा हस्तक्षेप, व्यापाऱ्यांचे कमीशन यामुळे ग्राहकांच्या हाती पडेपर्यंत शेतमालाची किमंत वाढत जाते. उत्पादन खर्चाच्या तुलनेत शेतकऱ्याला मिळणारा नफा अत्यल्प तर दुसरीकडे व्यापारी २४% ते २७% ठोक विक्रेता १२% आणि किरकोळ विक्रेता १२% ते १५% नफा मिळवतात. अशा व्यवस्थेत व्यापारी ग्राहकांची लूट करत असल्याने महागाई वाढत जाते.

६) **देशाची आर्थिक स्थिती :–** भारतीय अर्थव्यवस्थेची आर्थिक वृध्दी झपाटयाने होत असल्यामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने आहाराविषयक सवयी बदलल्या त्यातून अन्नधान्याची मागणी वाढली. अन्नधान्य साठयामध्ये घट होण्याच्या शक्यतेमुळे धान्य

बाजारात साठेबाजी प्रवृत्ती वाढत गेली. तसेच जैविक इंधनासाठी धान्याचा वापर मदयार्क निर्मितीसाठी वापर, वाढल्यामुळे महागाईस अनुकूल वातावरण तयार झाले.

७) **सरकारचा अनावश्यक खर्च :–**

देशातील लोकशाही शासन प्रणालीमुळे कल्याणकारी योजनांवर मोठया प्रमाणवर खर्च होतोच शिवाय दर पाच वर्षांनी होणाऱ्या निवडणुकावर मोठया प्रमाणात खर्च केला जातो. केंद्र, राज्यसरकार व स्थानिक स्वराज्य संस्था असे त्रिस्तरीय सरकार चालविण्यासाठी खर्च होतो. त्यात महत्वाचे म्हणजे मंत्री, शासकीय अधिकारी यांचे देश, विदेश दौरे, त्यांच्या संरक्षणावरील खर्च, निवासावरील खर्च, भत्ते यावर होणारा खर्च वाढत आहे. अनावश्यक कार्यावर मोठा खर्च होत असल्यामुळे आवश्यक वस्तूंचे उत्पादन कमी होऊन त्यांच्या किमंती वाढतात.

८) **संरक्षण खर्चातील वाढ :–**

देशाच्या सीमेवर सुरू असणाऱ्या कारवाया कारगील युध्द, मुंबईवर झालेला अतिरेक्यांचा दहशतवादी हल्ला, बॉम्बस्फोट, नक्षलवादी कारवाया अशा स्वरूपाच्या संकटावर नियंत्रण आणण्यासाठी युध्द साहित्य व शस्त्र यांनी सज्ज ठेवावा लागतो. तसेच पोलिसदल, सैनिक अधिकारी, कर्मचारी यांचे वेतन, निवृत्ती वेतन, भत्ते यावर मोठया प्रमाणावर खर्च करावा लागतो. त्यामुळे उत्पादक क्षेत्रातील काही साधन सामग्री काढून ती संरक्षण साहित्याच्या निर्मीतीसाठी वापरली जाते. त्यामुळे उपभोग्य वस्तू उत्पादनात घट होऊन किंमतीत वाढ होते.

९) **सरकारकडून ठरविण्यात येणाऱ्या किंमती :–**

प्रमुख पीक व प्रमुख औदयोगिक उत्पादनाच्या किंमती शासना मार्फत ठरविल्या जातात. वीज, खनिज तेल, सिमेंट, कोळसा, रेल्वे वाहतूक, विमान वाहतूक यांचे दर शासन ठरवित आहे. त्यांच्या किंमतीत सरकारने वाढ केल्यामुळे ज्या क्षेत्रात या वस्तूंचा वापर केला जातो त्या क्षेत्रातील उत्पादनाच्या किंमतीत वाढ होते. वाहतूक क्षेत्रातील किंमत वाढीचा परिणाम तर सर्वच क्षेत्रातील किंमत वाढीत होत असते.

१०) **घडून येणारे घोटाळे व भ्रष्टाचार :–**

देशात घोटाळयांची व भ्रष्टाचाराची मालिका सुरू असून त्यात वाढ होत आहे. टू जी स्पेक्ट्रम, आदर्श घोटाळा, कोळसा घोटाळा व हेली कॉप्टर घोटाळा, सिंचन घोटाळा, भूखंड घोटाळा ही बाब समाजासाठी घातक आहे. कारण यातून अनाचार व गुन्हेगारीला उत्तेजन मिळते. पैशाच्या अफरातफरी प्रमाणेच भ्रष्टाचारही देशामध्ये विकास व चांगल्या प्रशासनाच्या मार्गातील अडथळा ठरणारा प्लेगसारखा भयंकर रोग आहे. यातून करचुकवेगीरी, काळा पैसा निर्माण होऊन किंमत वाढीस अनुकूल वातावरण तयार होते.

याशिवाय सरकारचे अनियोजित धोरण, सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील दोष, अनियोजित आयात–निर्यात धोरण, उदयोग क्षेत्राचा वाढता विकास, जागतिक तापमान वाढीचा परिणाम,शेतीस आवश्यक आदानांच्या वाढत्या किंमती,शेतीची उत्पादकता यामुळे असमतोल निर्माण होऊन महागाई वाढीस मदत होते.

**महागाईचे होणारे परिणाम :–**

महागाईच्या संदर्भात अर्थतज्ज्ञांच्या मते साधारणपणे ३ भाववाढ प्रवृत्ती आर्थिक विकासाला उपयुक्त ठरते. परंतू देशात सध्या घडून आलेली भाववाढ अधिक असल्याने दुरगामी परिणाम करणारी ठरते. यांचा समाजातील सर्व घटकावर आर्थिक व सामाजिक परिणाम झाल्याचे दिसून येते ते पुढीलप्रमाणे.

१) महागाईमुळे सर्वसामान्य कुटूंबाच्या आहारातील मुख्य घटक असलेल्या भाज्या डाळी, बटाटे, दुध, अंडी, मांस यांच्या किंमती वाढल्याने कुटूंबाचा ताळेबंद धोक्यात आला आहे. एप्रिल २०१२ मध्ये ७.२३% तुलनेत मे मधील महागाईचा दर ७.५५% नोंदला गेला. तर अन्नधान्य महागाईचा दर वधारून १०.४७% झाला यामध्ये भाज्या ४९.४३%, बटाटे ६८.९०%, दुध ११.९०%, मांसाहारी पदार्थ १७.८९%, तांदूळ ५.०७%, डाळी १६.६१% तर गव्हू ६.८१% नी महाग झाल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्य कुटूंबाना आपला खर्चात कपात करावी लागली आहे.

२) भाववाढीतच विनाशाची बिजे असतात. त्यामुळे महागाईत अधिक वाढ झाल्यास अर्थव्यवस्था मंदीकडे जाते.

३) देशातील महागाईने निर्यात स्पर्धा सामर्थ्य कमी होणार त्यामुळे भयावह आर्थिक स्थिती १९९१ च्या आर्थिक स्थितीची आठवण करून देणारी ठरते.

४) अनुचित मार्गानी लाभ मिळवण्याची प्रवृत्ती बळावून काळाबाजार, भ्रष्टाचार भेसळ वाढते नैतिक अध:पतन वाढीस लागते.

५) महागाईने मनुष्य स्वार्थी बनून पैशामागे धावतो. यातून भ्रष्टाचार वाढत जातो. यास बॅकाही मदत म्हणून काळया पैशाचा पांढरा पैसा करून कमीशन मिळविताना दिसतात. मानवी संस्कृतीची नैतिक मुल्ये व तत्वे उध्वस्थ होतात. यात भारताचा ८७ वा क्रमांक लागतो.

६) उत्पन्न व संपत्ती वितरणात विपरीत परिणाम होऊन आर्थिक विषमता वाढते. गरीब व श्रीमंत, व्यापारी व उत्पादक अशी दरी निर्माण होऊन ती वाढत जाते.

७) महागाईमुळे सर्वसाधारण जनतेचा तसेच श्रमिकांना मोठा फटका बसतो. त्याची हानी होते. त्यांचा खर्च वाढून श्रमशक्ती मजूरी कमी होते. या उलट व्यापाऱ्यांना व मालकांचा फायदा वाढतो.

८) महागाईमुळे निर्यात कमी होऊन व्यापारशेष प्रतिकूल होतो.

९) विनिमय दरातील स्थैर्य महागाईत टिकवणे कठीण होते. सध्या भारताचा विनिमय दर घसरून ५५रू. प्रतीडॉलर झालेला आहे. यातून स्वदेशी चलनाचे विनिमय मुल्य घसरते.

१०) लाभाच्या हेतूने व्यापारी जीवनाश्यक वस्तूंची अन्नधान्यांची साठेबाजी केल्याने कृत्रीम टंचाई निर्माण करून मानवनिर्मित दुष्काळाची परिस्थीती उदभवते.

११) अधिक नफयाच्या अपेक्षेने चैनिच्या वस्तूचे उत्पादन वाढीस चालना मिळते.

१२) वाढत्या महागाईने सर्वसामान्यामध्ये कुपोषण, भूकबळी, उपासमार दारिद्रयात भर पडते.

१३) वाहतूक, दळणवळण, विज यावरही प्रतिकूल परिणाम होतो.

१४) राजकीय आंदोलने होतात, निषेधार्थ वृत्तपत्रे, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्ष, प्रचार, मतप्रदर्शन करतात. सरकारबदल असंतोष निर्माण होतो.

**सारांश :–** महागाईने संपुर्ण जगात सर्वसामान्याचे जीवनमान नकोसे केलेले दिसून येते. भारतात त्याची तिव्रता अधिक आहे. २००३ मध्ये महागाईचा दर ३.३% असताना सध्या तो ९% च्या आसपास आहे. या महागाईचा ठराविक घटकांना फायदा होत असला तरी सर्वसामान्यांचे प्रचंड हाल होत आहेत. देशाच्या आर्थिक विकासाठी सरकारला खर्च करावा लागतो. त्यातून सरकारच्या उत्पन्नापेक्षा खर्च अधिक होऊन तो भरून काढण्यासाठी दरवर्षी पैशाच्या पुरवठयात वाढ करावी लागते. तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठयापेक्षा मागणी अधिक वाढून महागाई वाढत आहे. तसेच निर्सगाची होणारी अवकृपा यातून त्यात भरच पडत आहे. आर.बी.आय. नी व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा (८.५%) घाऊक किमंत निर्देशांकवर आधारित महागाई जानेवारी २०१० मध्ये ८.५४% २०११ मध्ये १२.११% तर डिसेंबर २०१२ मध्ये १०.५८% झाली.)

महागाईतून मार्ग काढण्यासाठी काही मार्गाचा अवलंब केल्यास काही प्रमाणात बदल होऊ शकेल असे वाटते. त्यामध्ये सरकारने जीवनाश्यक वस्तूंचा मागणीच्या मानाने पुरवठा वाढविण्यासाठी देशात योग्य वातावरण निर्माण करावे. तसेच महागाई भ्रष्टाचार हे दोन वेगळे प्रश्न नसून त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यासाठी भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यासाठी रिझर्व्ह बॅंकेने नवीन चलन बाजारात आणताना या नोटांना औषधाप्रमाणे एक्सपायरी डेट असावी तसेच चलनातून ५००रू. व १०००रू. नोटा काढून घ्याव्यात. सर्व प्रकारचे व्यवहार हे बॅंकामार्फत व्हावेत. याबाबत सक्ती करावी. तसेच थेट रोकड हस्तांतरण योजनांची सर्वत्र प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. सर्वसामान्याची श्रम शक्ती वाढविण्यासाठी देशात गुंतवणूक वाढवून रोजगार संधी वाढविली पाहिजे तरच काही प्रमाणात वाढत्या महागाईबरोबर सर्वसामान्यांच्या उत्पन्नातही वाढ होऊ शकेल. यातून सर्वसामान्यांना या महागाईच्या स्थितीत तग धरून राहता येईल.

**संदर्भ ग्रंथ :–**


१) डॉ. भालचंद्र मृणगेकर (२०११): 'आर्थिक सुधारणा आणि विकासाचा मानवी चेहरा' लोकवाड:मय गृह, मुंबई.

२) दत्त, सुंदरम (२०११): 'इंडियन इकॉनॉमी' एस.चांद ॲण्ड कंपनी लिमिटेड, न्यू दिल्ली.

३) Misra & Puri (2009) : 'Indian Economy'. Himalaya Publishing house, Mumbai.

४) प्रा.शरद शंकर जोशी (२००९): 'भारतीय अर्थव्यस्थेची वाटचाल' डायमंड पब्लिकेशन, पुणे.

५) Economic and political Weekly Dec. 26 th 2009, Jan. 1, 2010

६) WWW. Inflation in India – 2012

७) The Government of India, 'Economic Survey' 2002-03 & 2010-11

८) रमेश पाध्ये:'वाढती महागाई – एक अवलोकन' परिवर्तनाचा वाटसरू पुणे १ ते १५ सप्टेंबर २०१२

९) डॉ. दत्तात्रय बागडे: 'किंमतवाढ एक समस्या', योजना मुंबई ऑगस्ट २०१०.

१०) दैनिक लोकसत्ता – ४ सप्टेंबर २०११, ११ जाने, ३१ जाने.२०१२, १५जून २०१२, ७ मे २०१२